# मेट्रो-३ च्या १३ स्थानकांचे १०० टक्के खोदकाम पूर्ण



» मुंबई (प्रतिनिधी) :

मुंबई मेट्रो-३ च्या २६ स्थानांपैकी १३ स्थानकांचे शंभर टक्के काम पूर्ण झाले आहे. अवघ्या १८ महिन्यांमध्ये मेट्रो प्राधिकरणाने ५० टक्के भुयारीकरणाचा टप्पा पार केला आहे. या मार्गासाठी एकूण ५६ किमी (अप आणि डाऊन)चे भुयारीकरण करायचे आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ हा मुंबईच नव्हे, तर भारतातील सर्वात लांब संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्ग आहे. भुयारीकरणाप्रमाणे खोदकाम, बेस स्लॅब, कॉनकोर्स स्लॅब, कॉलम तसेच भिंतींची बांधणी यासारखी कामे देखील युद्धपातळीवर सुरु आहेत.

मेट्रोचे खोदकाम पूर्ण झालेल्या स्थानकांमध्ये कफ परेड, विधान भवन, चर्चगेट, हुतात्मा चौक, सीएसएमटी, सायन्स म्युझियम, सिद्धिविनायक, एमआयडीसी, मरोळ नाका, सहार रोड, सीएसएमआयए-आंतरदेशीय, सीएसएमआयए - आंतरराष्ट्रीय विमानतळ व सीप्झ या स्थानकांचा समावेश आहे. उर्वरित स्थानकांचे खोदकाम देखील युद्ध पातळीवर सुरू आहे. उर्वरित १३ स्थानकांचे खोदकाम मे महिन्यापर्यंत पूर्ण होणार आहे. १३ स्थानकांचे काम ८७ टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे.